RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ८, अंक २१] शुक्रवार, मे १३, २०२२ / वैशाख २३, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक २९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ मे २०२२

**अधिसूचना**

**चौकशी आयोग अधिनियम, १९५२.**

क्रमांक उचौस (चौकशी)-२०२१/ प्र. क्र.४९/२१.- ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, श्री. परम बिर सिंह यांनी त्यांच्या दिनांक २० मार्च २०२१ च्या पत्राद्वारे माननीय गृहमंत्री यांच्याविरुद्ध केलेल्या आरोपांची चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक उचौस (चौकशी) २०२१/ प्र. क्र.४९/२१, दिनांक ३० मार्च २०२१ अन्वये माननीय न्यायाधीश श्री. कैलास उत्तमचंद चांदिवाल (सेवानिवृत्त) यांची एक सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त समिती" असा केला आहे) नियुक्त केली होती ;

आणि ज्याअर्थी,महाराष्ट्र शासनाने, ही बाब जनहिताच्या दृष्टीने निश्चितच महत्त्वाची बाब असल्याने, उक्त समितीने करावयाच्या चौकशीचे स्वरूप आणि प्रकरणाची अन्य परिस्थिती विचारात घेऊन, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एचएलइ-२०२१/ प्र.क्र.५७/कार्या.- २१, दिनांक ३ मे २०२१ अन्वये चौकशी आयोग अधिनियम, १९५२ (१९५२ चा ६०) याची कलमे ४, ५, ५अ, ८ व ९ यांच्या तरतुदी उक्त समितीस लागू केलेल्या होत्या ;

आणि ज्याअर्थी, उक्त समितीने,२६ एप्रिल २०२२ रोजी तिचा अहवाल, शासनास सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाचे असे मत आहे की, उक्त समिती नियमितपणे अस्तित्वात ठेवणे अनावश्यक आहे ;

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ७ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे असे घोषित करीत आहे की, उक्त समिती, दिनांक ३० एप्रिल २०२२ पासून अस्तित्वात असल्याचे समाप्त झाली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दि. प्र. देशमुख,**
शासनाचे उप सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 13th May 2022

*NOTIFICATION*

COMMISSIONS OF INQUIRY ACT, 1952.

No. उचौस(चौकशी)-2021/प्र. क्र. 49/21.— Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Resolution No.उचौस (चौकशी)-2021/प्र. क्र.49/21, दिनांक 30 मार्च 2021, appointed Hon'ble Justice Shri Kailas Uttamchand Chandiwal (Retired), One Member High Level Inquiry Committee (hereinafter referred to as "the said Committee"), for the purpose of making an inquiry into the allegations made by Shri Param Bir Singh in his letter dated the 20th March 2021, against the then Hon'ble Home Minister ;

And whereas, the Government of Maharashtra has *vide* General Administration Department, Government Notification No. HLE-2021/C.R.57/Desk-21, dated the 3rd May 2021, made applicable the provisions of sections 4, 5, 5A, 8 and 9 of the Commissions of Inquiry Act, 1952 (60 of 1952) (hereinafter referred to as "the said Act") to the said Committee having regard to the nature of the inquiry to be made by the said Committee and other circumstances of the case the matter being a definite matter of public importance ;

And whereas, the said Committee has submitted its report to the Government on the 26th April 2022 ;

And whereas, the Government of Maharashtra is of the opinion that the continued existence of the said Committee is unnecessary ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*a*) of section 7 of the said Act, the Government of Maharashtra hereby declares that, from the 30th April 2022 the said Committee has ceased to exist.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. P. DESHMUKH,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.